ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १५ जून, १९५५ | अंक २४

## विविध माहिती

**अमेरिकेंतील दोन कंपन्यांचें एकीकरण**—अमेरिकेंतील बेलहेम स्टील कॉर्पोरेशन आणि यंग्स टाऊन स्टील अँड ट्यूब कंपनी ह्या दोन कंपन्यांचें एकीकरण करण्यांत येणार आहे. ह्या दोन कंपन्या आधींच प्रचंड आहेत. तथापि त्यांचें एकीकरण करून पोलादाचें उत्पादन ३०,००,००० टनांनीं वाढविण्याची योजना कंपन्यांच्या चालकांनीं आंखली आहे.

**भारतीय उद्योगधंद्यांचें प्रदर्शन**— फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संस्थेनें भारतीय सरकारच्या मदतीनें भारतीय उद्योगधंद्यांचें एक मोठें प्रदर्शन दिल्ली येथें भरविण्याचें ठरविलें आहे. प्रदर्शन २९ ऑक्टोबरपासून १५ डिसेंबरपर्यंत खुलें राहील. तें उभारण्यासाठी सुमारें ५० लाख रु. खर्च येईल. प्रदर्शनांत बरींच परकीय राष्ट्रं भाग घेतील.

**धबधब्यांची पहाणी**—उत्तर प्रदेश सरकारनें उत्तर गढवाल भागांतील धबधब्यांची पहाणी करून पाणलोटांच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्याची शक्यता अजमावण्यासाठी प्रादेशिक तपासणी करण्याचा हुकूम काढला आहे. ह्या भागांतील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी व शेतीसाठी पाणीपुरवठा करण्यासाठी पहाणी करण्यांत येत आहे.

**पाटणा येथें पाण्याचें दुर्भिक्ष**—पाटणा शहराच्या ३॥ लाख लोकसंख्येपैकी एक चतुर्थांश लोकांना पाण्याची दुर्मिळता जाणवत आहे. शहराच्या पूर्व भागांतील बहुतेक विहिरी आटल्या आहेत. पाणी उपसणाऱ्या विजेच्या पंपांना विजेचा अपुरा पुरवठा होत असल्यानें वरील परिस्थिति उद्भवली आहे.

**रक्तदाबावरील औषधी वनस्पती**—ऑस्ट्रेलिअन शास्त्रज्ञांनीं ‘ रिसपाईन ’ हें रक्तदाबावरील परिणामकारी औषध एका ऑस्ट्रेलिअन वृक्षापासून तयार करण्याची कृति शोधून काढली आहे. आतांपर्यंत हें औषध तयार करण्यासाठी लागणारी वनस्पति भारतांतच मिळत असे. भारत सरकारनें देशाची गरज पुरी करण्यासाठी ह्या वनस्पतीची निर्यात बंद केलेली आहे.

**कला व संस्कृतीसाठी वेगळें खातें**—सुप्रसिद्ध नर्तक श्री. उदयशंकर ह्यांनीं अशी सूचना केली आहे, कीं भारतीय सरकारनें नृत्य व संस्कृति ह्या विषयांसाठी स्वतंत्र खातें निर्माण करावें. श्री. उदयशंकर आपल्या कलापथकासमवेत ता. २० जून रोजीं झेकोस्लोव्हाकिआच्या दौऱ्यावर जाणार आहेत.

**कांबोडिआला भारताची मदत**—कांबोडिआच्या जनतेला ५,९०० टन तांदूळ देणगी म्हणून देण्याचें भारतीय सरकारनें कबूल केलें होतें. त्यापैकी २,५०० टन तांदूळ भरून घेऊन मद्रासहून एक बोट नुकतीच कांबोडिआला जाण्यास निघाली.

**आर्थिक मदतीची तरफदारी**—अमेरिकेच्या प्रतिनिधी गृहाच्या परराष्ट्रीय-संबंध-कमिटीमध्यें परदेशांना देण्यांत यावयाच्या ३५३ कोटी डॉलर्सच्या मदतीबद्दल चर्चा चालू होती. कमिटीपुढें बोलतांना अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मि. डलस म्हणाले कीं, अमेरिका म्हणेल तसेंच वागणाऱ्या देशांना अमेरिकेनें मदत द्यावी, असेंच कांहीं नाहीं.

**पाकिस्तानांत अमेरिकन भांडवल**— पाकिस्तानमधील उद्योगधंद्यांत खाजगी अमेरिकन भांडवल गुंतविण्यासंबंधीचा करार उभयता देशांत करण्यांत आला आहे. भांडवलाच्या सुरक्षिततेची हमी अमेरिकन सरकारनें घेतली आहे. पाकिस्तानचें आर्थिक बळ वाढविण्याचा कराराचा उद्देश आहे.

**भारतीय कथालेखकाला बक्षिस**—न्यूयॉर्क हेरल्ड ट्रायब्यून ह्या वृत्तपत्रानें चांगल्या कथांना बक्षिसें देण्याची योजना जाहीर केली होती. ह्या स्पर्धेत १९ देशांच्या लेखकांकडून गोष्टी आल्या होत्या. एकूण गोष्टींची संख्या ५७ होती. स्पर्धेतील तिसरें, २०० डॉलर्सचें, पारितोषक श्री. निर्मलकुमार मुस्ताफा ह्या बंगाली लेखकाला देण्यांत आलें आहे.

**अणुस्फोटाच्या प्रयोगाबद्दल नुकसानभरपाई**—पॅसिफिक महासागरांत, मार्च १९५४ मध्यें हैड्रोजन बॉंबचा प्रायोगिक स्फोट करण्यांत आला होता. त्यावेळीं मार्शल द्वीपसमुहांत राहणाऱ्या लोकांवर अणुदूषित धुळीचा वर्षाव झाला होता. प्रयोगांत झालेल्या मालमत्तेच्या नुकसानीबद्दल अमेरिकेनें मालमत्तेच्या मालकांना ६,८६९ डॉलर्स दिले आहेत. कोणाच्याहि जीविताला धोका पोंचल्याची तक्रार करण्यांत आली नव्हती.

**निर्वासितांना रोजगार देण्यासाठी**—पूर्व बंगालमधून पश्चिम बंगाल्यांत आलेल्या निर्वासितांना रोजगार देण्यासाठी मध्यम प्रतीचे उद्योगधंदे काढविण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. अशा प्रकारचे धंदे काढण्यासाठी ७ खाजगी उद्योगपतींना २ कोटी रुपयांपर्यंत कर्ज देण्याचेंहि सरकारनें ठरविलें आहे.

**पुरांत आश्रय देणारीं घरें**—उत्तर-प्रदेशांतील ज्या जिल्ह्यांतून दरवर्षीं पूर येतो, अशा जिल्ह्यांतून पूर आल्यावर आश्रयासाठी उपयोगी पडण्यासारखीं घरें बांधण्याचें सरकारनें ठरविलें आहे. घरांना लागणारा कांहीं खर्च सरकार देणार असून कांहीं त्या त्या भागांतील लोकांनीं सोसावयाचा आहे.

**खताचा नवीन कारखाना**—अलवाये येथील एका कंपनीनें काढलेल्या अमोनियम क्लोराइडच्या कारखान्यांत उत्पादनास नुकताच प्रारंभ झाला. हा कारखाना विस्ताराच्या दृष्टीनें सिंद्री येथील खताच्या कारखान्याच्या खालोखाल आहे.

**राजस्थानांत लोखंडाच्या खाणी**—राजस्थानमधील उदयपूर विभागांत तीन ठिकाणीं लोखंडाच्या खाणी निघण्याची शक्यता आहे, असें समजतें. राज्य-सरकारच्या भूस्तरखात्यानें कोटा व जोधपूर विभागांतहि खनिजांचें संशोधन आरंभिलें आहे. १९५३-५४ सालीं राजस्थाननें ९,००० टन लोखंडाची माती निर्यात केली. चालू वर्षी निर्यात ११,००० टनांवर गेली आहे.

**गांधीजींच्या ग्रंथाच्या तामिळी आवृत्त्या**—गांधी स्मारक निधीतर्फे महात्मा गांधींच्या सर्व ग्रंथांच्या तामिळी आवृत्त्या प्रकाशित करण्यांत येणार आहेत. सर्व ग्रंथांचें प्रकाशन होण्यास १० खंड लागतील आणि त्यासाठीं सुमारें २·५ लाख रुपये खर्च येईल.

**पं. नेहरूंच्या ग्रंथाची रशिअन आवृत्ति**—पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनीं तुरुंगांत असतांना लिहिलेल्या "डिस्कव्हरी ऑफ इंडिआ" ह्या ग्रंथाचें रशिअन भाषांतर, रशिआंत नुकतेंच प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. ह्या आवृत्तीसाठीं पं. नेहरू ह्यांनीं मुद्दाम नवी प्रस्तावना लिहिली आहे.

**सर्कसवाल्याला विमानांची मदत**—ब्रिटनमध्यें चालू असलेल्या रेल्वेच्या संपामुळें एका सर्कस कंपनीला आपले हत्ती खेळाच्या नव्या गांवीं नेण्याची फार पंचाईत पडली. ब्रिटनमधील अमेरिकेच्या लष्करी विमानांनीं दहा हत्ती विमानांतून वेळेवर मुक्कावर पोंचविण्याची तयारी दाखविली आहे. हत्तींचें वजन २१ टन असून त्यांना वाहून नेण्यासाठीं रणगाडे नेणाऱ्या विमानांचा उपयोग करावा लागेल.

**अमेरिकेंतून आलेलें तूप**—कांहीं दिवसांपूर्वी मद्रास बंदरांत अमेरिकन तूप घेऊन बोटी आल्या. हें तूप अणुरजःकणांनीं दूषित असल्यामुळें मनुष्याला अपायकारक आहे अशी तक्रार कांहीं सामाजिक कार्यकर्त्यांनीं केली होती. अमेरिकेंतील अणुस्फोटाचे प्रयोग ज्या ठिकाणीं होतात, तेथील गाईंच्या दुधापासून हें तूप बनविलें आहे अशी त्यांची माहिती होती. पण आरोग्य खात्यानें तूप निर्दोष आहे, अशी ग्वाही दिली आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

॥ भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा ॥ कृपावंत ऐसे कळो आले ॥

— तुकारामहाराज

— ३० सप्टेंबर १९५४ च्या हंगामांत सिंडिकेटला नफा झाल्यामुळें —

ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड देण्याचें

— संचालकांनीं मंजूर केलें आहे —

: : ३० सप्टेंबर १९५५ च्या हंगामांत १० टक्के डिव्हिडंडची हमी : :

एक लक्ष तीस हजार पोत्यांच्या उत्पादनानें आजच घेतली आहे

॥ पुढती पुढती पुढती ॥ अशीच होईजे प्रगती

CO-EXISTENCE AND NOT AGRESSION

ह्या शांततावादी तत्त्वाचा प्रचार आज सर्व राष्ट्रें करीत आहेत.

ह्याच तत्त्वाप्रमाणें

मध्यम वर्गाच्या सिंडिकेटवर

भांडवलवाल्यांनीं आक्रमण करूं नये

९८० सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. १-६-१९५५

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंटस्.

# अर्थ

बुधवार, ता. १५ जून, १९५५



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## साखर आणि तांदूळ

### समाधानकारक परिस्थिति

भारतांतील साखरेचें उत्पादन चालूं मोसमांत १६ लक्ष टन होईल. ३१ मे, १९५५ अखेर १५ लक्ष, ६७ हजार टन साखर तयार झाली आहे. अजून ३९ कारखाने ऊंस गाळीत आहेत; तेव्हां एकूण उत्पादन १६ लक्ष टनांपर्यंत सहज जाईल. गेल्या वर्षीच्या उत्पादनापेक्षा हें उत्पादन ६ लक्ष टनांनीं अधिक होईल. १९५१–५२ मधील उत्पादनाच्या उच्चांकापेक्षा हें उत्पादन १ लक्ष टन ज्यास्त भरेल.

साखरेचें उत्पादन वाढलें; पण उसाचें क्षेत्र, सुमारें ३६ लक्ष एकर, कायम आहे; त्यांत वाढ झालेली नाहीं. उसाचें उत्पादन चालू वर्षीं सुमारें ५६० लक्ष टन भरेल; म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा तें १०० टन अधिक असेल. उसाच्या उत्पादनांत वाढ होण्याचें मुख्य कारण खतांच्या वापरासाठी केलेला प्रचार, हें होय. साखरेच्या वर्षअखेर, म्हणजे १ नोव्हेंबर रोजीं, साखरेचा सांठा ८ लक्ष टन होईल.

चालू वर्षी उसाचें उत्पादन इतकें वाढलें, कीं पिकापैकीं कांहीं भाग शेतकऱ्यांना जाळून टाकण्याची पाळी येते कीं काय, अशी भीति निर्माण झाली होती. परंतु, आतां सर्व उसाचें साखरेंत रूपांतर होईल अशी खात्री आहे. २१ नव्या कारखान्यांच्या उभारणीस सरकारनें परवानगी दिलेली आहे. येत्या दोन–तीन वर्षांत ह्या नव्या कारखान्यांत साखर तयार होऊं लागली, म्हणजे एकूण उत्पादन २० लक्ष टनांवर जाईल अशी अपेक्षा आहे. तथापि, त्यामुळें साखरेची किंमत कितपत खाली येईल, हें सांगतां येत नाहीं.

भाताचें उत्पादन, जपानी पद्धतीच्या अवलंबामुळें, बरेंच वाढलें आहे; दर एकरीं सरासरी उत्पादन ८ मण होतें, तें ९½ मण झालें आहे. १९५३ मध्यें, जपानी पद्धतीचा प्रथमच, ७·४ लक्ष एकरांत प्रयोग करण्याचें ठरलें. प्रत्यक्ष ४·०१ लक्ष एकरांत जपानी पद्धतीनें लागवड झाली. त्याच्या उत्पादनाचा समाधानकारक अनुभव आल्या कारणानें, सरकारनें १९५३–५४ मध्यें २० लक्ष एकर क्षेत्र जपानी पद्धतीच्या लागवडीखाली आणण्याचें ठरविलें. प्रत्यक्ष १२ लक्ष एकरांत त्या पद्धतीनें लागवड झाली. १९५४–५५ मधील अनुभव त्याहिपेक्षा उत्तेजनकारक येईल, अशी अपेक्षा आहे. १९५३–५४ मध्यें २७२ लक्ष टन तांदळाचें उत्पादन झालें होतें; १९५४–५५ मध्यें तें २४२ लक्ष झालें. ह्याचें कारण, लागवडीचें क्षेत्र पूर्वी ७७० लक्ष एकर होतें तें ७४४ लक्ष एकर झालें. अंतर्गत उत्पादन पुरेसें होईल व सांठाहि भरपूर आहे, त्यामुळें कांहीं तांदळाची निर्गताहि करतां येईल..

---

## ऊंस–उत्पादनाबाबत पहाणी

ऊंस–उत्पादनाच्या सुधारलेल्या पद्धतींशीं शेतकऱ्यांचा नीटसा परिचय झालेला नाहीं, तेव्हां, शेतकी खात्यानें दाखवून दिलेल्या सुधारणांचा किती शेतकरी फायदा घेतात, त्यांना भांडवलाची कितपत अडचण पडते, इत्यादींची पहाणी तातडीनें करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे.

## जगांतील शेतीचें उत्पादन

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या शेती व अन्नखात्यातर्फे जगांतील शेतीच्या उत्पादनासंबंधीं १९५४–५५ सालचा अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं, अहवालाच्या सालीं शेतीच्या उत्पादनांत मागील वर्षाच्या तुलनेनें वाढ झालेली नाहीं. दुसरें महायुद्ध संपल्यापासून शेतीच्या जागतिक उत्पादनांत वाढ झाली नाहीं, असें हें पहिलेंच वर्ष आहे. पश्चिम युरोपांतील उत्पादनांत कांहीं प्रमाणांत वाढ झालेली आहे. अशीच वाढ दक्षिण अमेरिकेंत आणि अति–पूर्वेकडील देशांत झालेली आहे. परंतु त्याच वेळीं उत्तर–अमेरिकेंत उत्पादनांत घट झालेली आहे. जगांतील अन्नाच्या उत्पादनाविषयीं विचार करतां असें आढळून आलें कीं, निरनिराळ्या भागांतील प्रगतीचा वेग निरनिराळा आहे आणि त्यांत पुन्हां दरमाणशीं अन्नधान्याच्या खपांतहि बरीच तफावत आहे. त्यामुळें कांहीं भागांतील उत्पादन वाढलें असलें तरी एकंदरीनें अन्नधान्याच्या निर्मितीचा प्रश्न दीर्घकाळ पुरा पडणारा आहे. दुधाचा खप वाढावा म्हणून कांहीं देश व आंतरराष्ट्रीय संघटना प्रयत्न करीत होत्या. त्यांना असा अनुभव आला कीं, उत्पन्नाच्या मानानें दुधाच्या किंमती फार होत्या. दुधाच्या किंमती व उत्पन्न ह्यांच्यांतील व्यस्त प्रमाण अविकासित देशांत विशेष असल्याचें दिसून आलें. अविकासित देशांतील कामगाराला २ पाइंट दूध विकत घेण्यासाठी रोजच्या उत्पन्नाचा एकपंचमांश हिस्सा द्यावा लागत होता. ह्याच्या उलट, विकसित देशांतील कामगाराला एक पन्नासांशाचाच हिस्सा द्यावा लागत होता.

---

## जपानी पद्धतीनें भाताची लागवड

जपानी पद्धतीच्या भातशेतीची माहिती आपल्या इकडील पुष्कळ शेतकऱ्यांना आतां झालेली आहे. मूळ पद्धतींत जरूरीप्रमाणें थोडाफार बदल केलेला असला, तरी तिला जपानी पद्धत असेंच म्हटलें जातें. मुंबई सरकारच्या प्रसिद्धी खात्यानें ह्या पद्धतीची माहिती देणारी एक सचित्र पुस्तिका नुकतीच प्रसिद्ध केली आहे. ( पृ. सं. ४०. किं. अर्धा आणा. ) जपानी पद्धतीची तपशीलवार माहिती तींत सुबोध रीतीनें देण्यांत आली आहे. पुस्तिकेच्या प्रस्तावनेंत शेतकी खात्याचे मंत्रि, श्री. हिरे, हे म्हणतात कीं, ह्या पद्धतीला प्रारंभ मार्च, १९५३ मध्यें करण्यांत आला. त्यानंतरची ह्या राज्यांतील जपानी पद्धतीची प्रगति अत्यंत समाधानकारक आहे. नाशिकच्या एका शेतकऱ्यानें तर दर एकरीं १६,५०० पौंड उत्पन्न काढून जागतिक विक्रम केला आहे. अद्याप कित्येक ठिकाणीं जपानी पद्धतीचा अंगीकार करण्यांत आलेला नाहीं. चालू वर्षाच्या खरीप पिकापासून ह्या पद्धतीचा प्रसार अधिक नेटानें केला जात आहे. प्रस्तुत पुस्तिकेंतील माहिती ह्या प्रसारास उपयोगी पडणारी आहे. पुस्तिका इंग्रजीप्रमाणें मराठी, गुजराती व कन्नड भाषेंतहि प्रसिद्ध करण्यांत आली आहे व तिची दोन पैसे ही किंमत नाममात्र आहे. पुस्तिकेचा उद्देश सफल होवो.

## मुंबई राज्यांतील भाताची लागवड

### ( जिल्हावार आंकडे )

| जिल्हा | भाताखालील क्षेत्र, हजार एकर |
|---|---|
| १ अहमदाबाद | ६०,००० |
| २ खेडा | १,०७,००० |
| ३ पंचमहाल | २,८३,००० |
| ४ भडोच | १,०१,००० |
| ५ सुरत | २,५३,००० |
| ६ बनासकांठा | ३,००० |
| ७ साबरकांठा | ७२,००० |
| ८ अमरेळी | ५,००० |
| ९ बडोदें | २,३५,००० |
| १० मेहसाना | १९,००० |
| ११ डांग | ११,००० |
| १२ ठाणें | ३,८१,००० |
| १३ पू. खानदेश | २०,००० |
| १४ प. खानदेश | ७३,००० |
| १५ नासिक | ६७,००० |
| १६ पुणें | ९२,००० |
| १७ अहमदनगर | २०,००० |
| १८ उ. सातारा | ५२,००० |
| १९ द. सातारा | २५,००० |
| २० कोल्हापूर | १,६७,००० |
| २१ सोलापूर | २६,००० |
| २२ विजापूर | १४,००० |
| २३ बेळगांव | १,५५,००० |
| २४ धारवाड | १,६६,००० |
| २५ कुलाबा | ३,१२,००० |
| २६ रत्नागिरी | ३,०६,००० |
| २७ कानडा | १,७३,००० |
| एकूण | ३१,००,००० |

---

### फिल्म सेन्सॉर बोर्डाचें कार्य

सेंट्रल फिल्म सेन्सॉर बोर्डानें १९५४ सालीं केलेल्या कार्याचा अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. गेल्या वर्षी बोर्डानें २७९ हिंदी चित्रपटांना व २३५ परदेशी चित्रपटांना भारतांतील सिनेमागृहांत दाखविण्याचे परवाने दिले. एकाहि हिंदी बोलपटाला परवानगी नाकारण्यांत आली नाहीं. परदेशी बोलपटांपैकी ३८ बोलपटांना सर्टिफिकिटें देण्यांत आलीं नाहींत. त्यापैकी २५ बोलपट गुन्हेगारीला प्राधान्य देणारे अगर अत्याचाराला प्रोत्साहन देणारे असे होते. ६ बोलपटांत परराष्ट्रांविरुद्ध प्रचार करण्यांत आलेला होता आणि ७ चित्रपट नीतिमत्तेला व सद्‌भिरुचीला बाधक अशा प्रकारचे होते. १९५१, १९५२, व १९५३ सालीं अनुक्रमें ५, १८ व २१ परदेशी बोलपटांना सर्टिफिकेटस नाकारण्यांत आलीं होतीं. ह्याच वर्षांत अनुक्रमें ३१५, ३१६ आणि २४७ परदेशी चित्रपटांना रजतपटावर दाखविण्याची परवानगी देण्यांत आली होती, १९५३ सालीं, २७० हिंदी बोलपटांना परवाने देण्यांत आले होते. १९५२ सालीं व १९५१ सालीं परवाने देण्यांत आलेल्या हिंदी बोलपटांची संख्या अनुक्रमें २६२ व २४४ होती. गेल्या वर्षी परवाने मिळालेल्या एकूण हिंदी चित्रपटांपैकी ११० हिंदी भाषेंतील, ४८ बंगाली भाषेंतील, ४० तामीळ भाषेंतील, २७ तेलगू भाषेंतील, १८ मराठी भाषेंतील, १० कानडी भाषेंतील, ८ मल्याळी भाषेंतील, ३ इंग्रजी भाषेंतील, ३ पंजाबी भाषेंतील आणि १ ओरिया भाषेंतील, असे होते. त्याशिवाय ४०४ हिंदी लघुपट आणि १३५६ परदेशी लघुपट ह्यांनाहि बोर्डानें परवाने दिले.

---

### जपानमधील नमुनेदार छोटे उद्योगधंदे

'भारतामधील प्रमुख उद्योगधंदे'चे एक वार्षिक, प्राध्यापक एम्.पी. गांधी काढीत असतात. सध्या प्राध्यापक गांधी हे जपानच्या दौऱ्यावर असून तेथील छोट्या उद्योगधंद्यांचा अभ्यास करीत आहेत. आपल्या दौऱ्यांतील अनुभवासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, भारतानें आपल्या अर्थव्यवस्थेंत छोटे उद्योगधंदे सामावून घेतल्यास फार फायदा होण्यासारखा आहे. अर्थात्, ह्या बाबतींत थोडाफार फरक करावा लागेल. भारतांत जपानसारखे छोटे उद्योगधंदे निघाले तर पुष्कळ लोकांना काम मिळेल, त्यांची खरेदी करण्याची शक्ति वाढेल आणि मोठ्या धंद्यांत तयार होणाऱ्या वस्तूंचा खप वाढून त्यांनाहि मदत होईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत काढण्यांत येणाऱ्या छोट्या उद्योगधंद्यांमुळें सुमारें ९० लाख लोकांना रोजगार मिळेल. ह्या उद्योगधंद्यांना फार थोडें भांडवल पुरतें आणि त्यांच्यामुळें शहरापासून दूर अशा सोयीच्या ठिकाणीं जास्तींत जास्त लोकांना काम मिळतें. जपानच्या अर्थव्यवस्थेंत छोट्या उद्योगधंद्यांनीं जें कार्य केलें आहे, तें नजरेंत भरण्यासारखें आहे. भारताला तर त्यांच्यामुळें जपानपेक्षाहि अधिक फायदा होईल. कारण, भारतांत देशांतल्या देशांतच बरीच साधनसामुग्री व कच्चा माल उपलब्ध आहे. शिवाय, भारताच्या अर्थव्यवस्थेवर चलनवृद्धीचा ताणहि नाहीं. जपानविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, जपानमध्यें कारखान्यांची व शेतीची वाढ एकाच वेळीं झालेली दिसते. जपानचा कांहीं भाग १८ व्या शतकाला शोभेल असा आहे, तर कांहीं भाग २० व्या शतकाला साजेसा आहे.

---

### दुकानांतील स्त्री-विक्रेत्यांना हौलदार करण्याचा वर्ग

नॅशनल असोसिएशन ऑफ मिक्स्ड क्लब्सतर्फे, दुकानांतील स्त्री-विक्रेत्यांसाठी इंग्लंडमध्यें एक अभ्यासाचा वर्ग चालविण्यांत येत आहे. विक्रयकलेचें शिक्षण ह्या वर्गांतून देण्यांत येत नाहीं, तर मुलींनीं डौलदारपणें कसें बोलावें, चालावें, हें शिकविण्यांत येतें. लंडनमधील १० मोठ्या दुकानांनीं त्यांच्याकडील विक्रेत्यांना वर्गांत पाठवावें, असा प्रयत्न चालू आहे. कांहीं यशस्वी मुलींची व वर्गांतील शिकाऊ मुलींची प्रत्यक्ष भेट करविण्यांत येते, त्याचा इष्ट असाच परिणाम होतो. स्टोअरमध्यें वेळेवर जाण्यासाठी त्यांतील मुलींना सकाळीं उठावें लागतें, त्यापेक्षाहि लवकर स्टुडिओंत जाणाऱ्या नटींना बिछान्यांतून बाहेर यावें लागतें, हें मुलींना समजलें, म्हणजे त्यांना बरें वाटतें.

---

**गुजरातमधील पाटबंधाऱ्यांचीं कामें**—पहिल्या पंचवार्षिक योजनेंत गुजरात इरिगेशन सर्कलमध्यें मोठी व मध्यम प्रतीचीं मिळून १७ पाटबंधाऱ्यांचीं कामें पूर्ण करण्याचें ठरलें होतें. पण आतांपर्यंत त्यांपैकी फक्त दोनच कामें पूर्ण करण्यांत आलीं आहेत. दोन्हीं कामांमुळें ३५,६०० एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होऊं लागेल.

## बँकांच्या शाखांतील घट व वाढ

१९५२–५४ मध्यें बँकांच्या कचेऱ्यांत आणखी घट झाली. बिगर–शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या १३५१ वरून १२७७ वर आल्या; म्हणजे त्या ७४ नें कमी झाल्या. शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांची संख्या ७३ नें वाढली. एक्सचेंज बँकांच्या कचेऱ्यांची संख्या पूर्ववत ६५ एवढी राहिली. खालील तक्त्यांत शाखांची घट–वाढ स्पष्ट केली आहे:–

| शेड्यूल्ड बँका | | बिगर–शेड्यूल्ड बँका | |
|---|---|---|---|
| नव्या कचेऱ्या उघडल्या | + ९६ | नव्या कचेऱ्या उघडल्या | + २१ |
| चालू कचेऱ्या बंद केल्या | – २८ | चालू कचेऱ्या बंद केल्या | – ९६ |
| दोन बँका शेड्यूलमधून वगळल्यामुळें घट | – ६ | दोन बँका शेड्यूलमधून वगळल्यामुळें वाढ | + ६ |
| फ्रेंच वसाहती सामील झाल्यामुळें वाढ | + ५ | फ्रेंच वसाहती सामील झाल्यामुळें वाढ | + १ |
| एक बिगर-शेड्यूल्ड बँक एका शेड्यूल्ड बँकेंत विलीन झाल्यामुळें वाढ | + ६ | एक बिगर-शेड्यूल्ड बँक एका शेड्यूल्ड बँकेंत विलीन झाल्यामुळें घट | – ६ |
| एकूण वाढ | + ७३ | एकूण घट | – ७४ |

शेड्यूल्ड बँकांनीं ९६ नव्या कचेऱ्या उघडल्या, त्यांपैकी एकट्या इंपीरिअल बँकेच्याच ३२ कचेऱ्या आहेत. ९६ नव्या कचेऱ्यांची राज्यवार वाटणी अशी आहे:—मद्रास १६, मुंबई १०, मध्यप्रदेश १०, पंजाब ९, उत्तरप्रदेश ७, पेप्सु ७, आंध्र ५, बिहार ५, प. बंगाल ५, दिल्ली ५, हैद्राबाद ४, मध्यभारत ३, म्हैसूर ३, आसाम २, विंध्यप्रदेश २, ओरिसा १, राजस्तान १, त्रावणकोर–कोचीन १.

बिगर–शेड्यूल्ड बँकांच्या ९६ कचेऱ्या बंद झाल्या, त्यांपैकी ५९ कचेऱ्या बंद होण्याचें कारण त्यांच्या बँका लिक्विडेशनमध्यें गेल्या, त्या नॉन–बँकिंग कंपन्या बनल्या, बँकिंग व्यवहार बंद झाला किंवा त्यांनीं कचेऱ्या बंद केल्या. सर्वांत जास्त, म्हणजे ३७ बंद कचेऱ्या, त्रावणकोर–कोचीन मधील होत्या.

---

### शेड्यूल्ड व बिगर–शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या, १९३८–५४

| | शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या | बिगर शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या | एकूण कचेऱ्या |
|---|---|---|---|
| | भारत आणि ब्रह्मदेश | | |
| १९३८ | ११२८ | ३४३ | १४७१ |
| १९४१ | १४५४ | १,०१४ | २४६८ |
| | अखंड भारत | | |
| १९४२ | १४४८ | १२६० | २७०८ |
| १९४५ | २९५६ | २३७८ | ५,३३५ |
| | स्वतंत्र भारत | | |
| १९४६ | २८५७ | २,०२९ | ४,८८६ |
| १९५० | २७७९ | १५७४ | ४३५३ |
| १९५४ | २७६४ | १२७७ | ४०४१ |

**अलविन मेटल वर्क्सची मालकी—**हैद्राबाद येथील अलविन मेटल वर्क्स, ॲसबेसटॉस सिमेंट कंपनी आणि फर्टिलायझर्स ॲंड केमिकल कंपनी, ह्या तीन कंपन्यांची मॅनेजिंग एजन्सी अल्लाउद्दीन ॲंड कंपनीकडून बिर्ला ब्रदर्स ह्यांच्याकडे गेली आहे. ह्या कंपन्यांचा अधिक विस्तार करण्यासाठीं बिर्ला ब्रदर्स कर्जे देणार आहेत.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. ह. व. गिरमे (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक
मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लक्ष रु. |
| रिझर्वस् व इतर फंडस् | ५¾ लक्ष रु. |
| खेळतें भांडवल | सव्वा कोटीवर |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ०–८–० |
| सेव्हिंग ... ... | रु. १–८–० |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २–०–० |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३–०–० |
| २ वर्षे मुदत ... | रु. ३–४–० |
| ३ वर्षे मुदत ... | रु. ३–८–० |
| ४ वर्षे मुदत ... | रु. ३-१२-० |
| ५ वर्षे मुदत ... | रु. ४–०–० |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

**भारतीय कलेचें प्रदर्शन**—मॉस्को शहरांत भारतीय कला-विषयक व संस्कृतिविषयक एक प्रदर्शन उघडण्यांत आलें आहे. प्रदर्शनांत भारताच्या अभिजात ग्रंथांचीं कांहीं हस्तलिखितें, शास्त्रीय ग्रंथ, कापड, कशिदाचें काम, उत्तमोत्तम भारतीय तैल-चित्रांच्या छोट्या प्रतिकृति, इत्यादी वस्तू ठेवण्यांत आल्या आहेत. सुमारें १५०० वर कलात्मक वस्तू प्रदर्शनांत आहेत.

**सौराष्ट्रांत कापडाची नवी गिरणी**—सौराष्ट्रांत सध्यां कापडाच्या नऊ गिरण्या आहेत. राजकोट जवळील एका गांवीं आणखी एक नवीन गिरणी काढण्याचे प्रयत्न कांहीं उद्योगपती करीत असून त्यांनीं सौराष्ट्राचे अर्थमंत्री श्री. मनुभाई ह्यांना सरकारनें आर्थिक साहाय्य करावें अशी विनंति केली आहे.

**भारतासाठी फ्रेंच विमानें**— भारतीय सरकार व फ्रेंच सरकार ह्यांच्या दरम्यान, भारतीय विमानदलासाठी फ्रेंच बना-वटीचीं विमानें घेण्यासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत. वाटाघाटी फलद्रूप झाल्या तर भारत फ्रेंच सरकारकडून जेटनें चालणारीं ८० विमानें विकत घेण्याचा करार करील.

### मराठा चेंबरचे नवे पदाधिकारी

शके १८७७ (सन १९५५-५६) सालासाठी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजचे पदाधिकारी पुढीलप्रमाणें निवडून आले आहेत :

अध्यक्ष :—श्री. म. वि. पुराणिक, घृतपापेश्वर इंडस्ट्रिज, लि., पनवेल.

उपाध्यक्ष :—(१) श्री. ग. रा. साठे, साठे बिस्किट ॲण्ड चॉकलेट कं. लि., पुणें.
(२) श्री. दा. वा. पोतदार, पुणें.
(३) श्री. शं. ल. किर्लोस्कर, पुणें.
(४) श्री. शं. रं. ठाकूर, ठाकूर सावदेकर आणि कं., पुणें.

खजिनदार :—श्री. श्री. श्री. मराठे, भारत पेन्सिल्स, पुणें.

कार्यवाह :—(१) श्री. गो. द. आपटे, पुणें.
(२) श्री. आ. रा. भट, पुणें.

**भारताचा पूर्व-आफ्रिकेशीं व्यापार**— "दि इंडिअन एक्स्पोर्टर अँड दि इंडिअन इंपोर्टर" ह्या नियतकालिकाचे संपादक श्री. पी. एम. शहा पूर्व आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेले होते. तेथील व्यापारी परिस्थितीसंबंधीं माहिती सांगतांना ते म्हणाले कीं, पूर्व-आफ्रिकेंतील ७० ते ८० टक्के व्यापार भारतीयांच्या हातीं असला तरी पूर्व-आफ्रिकेंत येणाऱ्या मालापैकीं ६ ते ७ टक्के मालच भारतीय असतो.


## THE TRAVANCORE OGALE GLASS MFG. CO. LTD.

## NOTICE

The Twelfth Annual General Meeting of the Shareholders of the Travancore Ogale Glass Manufacturing Company Limited, will be held at the Registered Office of the Company at the Glass Factory Premises, Manjummel, Alwaye, on Saturday, the 25tb June, 1955, at 4-30 p. m., to transact the following business :


1. To receive and adopt the Directors' Report and audited Balance Sheet and Profit & Loss Account for the year ended 31st December, 1954.
2. To elect Directors in place of those retiring.
3. To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

The Share Transfer Books of the Company will be closed from Monday, the 13th June to Saturday, the 25th June, 1955, both days inclusive.

*By Order of the Board,*
For **Ogale Brothers Limited,**
*N. P. OGALE,*
*Managing Agents.*

Alwaye,
May 4, 1955

★ किर्लोस्कर



सेंट्रिफ्युगल पंप
(टाइपः—एन् बी एस्.)
या पंपाची रचना अद्ययावत आणि सरल असल्यानें तो अनेक दृष्टींनीं किफायतशीर झाला आहे.

प्रमुख वैशिष्ट्यें:— ० बॉलबेअरिंगना अधिक संरक्षण ० पाईप कनेक्शन न सोडवितां तपासणीसाठीं खोलतां येतो.

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी.

कण आणि क्षण
(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)

पृ. सं. १६८] दुसरी आवृत्ति [किं. १॥ रु.

र. पु. परांजपे, ना. सी. फडके, शं. वा. किर्लोस्कर, चिं. वि. जोशी, इरावती कर्वे, इंदिराबाई वेवघर, इत्यादींचे उत्कृष्ट अभिप्राय.

—गुजराती भाषांतर—
સુખી જીવનની પગદંડી

सर्वत्र मिळतें. स्वतः वाचा, संग्रहीं ठेवा, आणि भेटीदाखल द्या.

## ब्रिटनची मोटारींची निर्यात

चालू वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत ब्रिटनमधील मोटारीच्या कारखानदारांनीं उत्पादनाचे उच्चांक गांठण्याचा धडाका चालविलेला दिसतो. ह्या काळांत ४,००,००० निरनिराळ्या प्रकारच्या मोटारगाड्या कारखान्यांतून तयार झाल्या. त्यांपैकी ५०% देशांतील बाजारपेठेंत गेल्या आणि बाकीच्या निर्यात करण्यांत आल्या. गेल्या सालीं ह्याच कालखंडांत जितक्या मोटारी तयार झाल्या, त्यापेक्षा चालू वर्षी ८०,००० मोटारी अधिक तयार झाल्या. अलीकडे ब्रिटनच्या कारखानदारांना परदेशांतील मोटारींच्या कारखानदारांशीं उत्तरोत्तर वाढती स्पर्धा करावी लागत आहे. असें असून सुद्धां गेल्या एप्रिल अखेर ब्रिटननें १,४४,००० मोटारी परदेशीं निर्यात केल्या. ट्रॅक्स व बसेस तयार करणाऱ्या कारखानदारांनीं एप्रिल महिन्यांत १५,००० पेक्षा अधिक गाड्या निर्यात करून महिन्याचा उच्चांक गांठला. आतांपर्यंत चालू वर्षी त्यांनीं ५६,००० गाड्या निर्यात केल्या आहेत. मोटारींशिवाय ४१,००० यंत्रचलित नांगरहि एप्रिल अखेर निर्यात करण्यांत आले. गेल्या सालांतील पहिल्या चार महिन्यांशीं तुलना करतां चालू वर्षाच्या ह्याच कालांतील नांगरांचें उत्पादन ४,००० नीं अधिक आहे. मोटार-सायकली व सायकली ह्यांच्या निर्यातींतहि वाढ झालेली दिसून येते. १९५५ सालच्या पहिल्या चार महिन्यांत ब्रिटननें २४,८९५ मोटार-सायकली निर्यात केल्या, त्यांची किंमत ४८,२०,००० पौंड झाली. ब्रिटनमध्यें सध्यां चालू असलेल्या रेल्वे-कामगारांच्या व गोदी-कामगारांच्या संपामुळें मात्र निर्यातीला धोका उत्पन्न झाला आहे.

---

## अहमदाबाद शहराला दुधाचा पुरवठा

अहमदाबाद कॉर्पोरेशननें शहरांतील नागरिकांना निर्जंतु शुद्ध दुधाचा पुरवठा करण्याची तयारी चालविली आहे. पुरवठ्याची योजना अंमलांत आणण्यासाठी ३० लाख रुपये खर्च करावे लागतील. शहराची लोकसंख्या सुमारें ९ लाख आहे. मुंबईचे मिल्क-कमिशनर श्री. खुरोडी ह्यांनीं ही वार्ता वृत्तपरिषदेंत जाहीर केली. त्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, पुढील तीन महिन्यांत दूध-पुरवठ्याच्या योजनेची तपशीलवार आंखणी करण्यांत येईल. तथापि, सर्वच्या सर्व योजना चालू होण्यास तीन ते चार वर्षांचा कालावधि लागण्याचा संभव आहे. शहराच्या आसपासच्या खेड्यांतील गवळ्यांपासून सहकारी सोसायट्यांमार्फत दूध गोळा केलें जाईल. नंतर तें अहमदाबादला आणून निर्जंतुमय करण्यांत येऊन बाटली-बंद करण्यांत येईल. अहमदाबाद शहरांत रोज सुमारें १०,००० मण दुधाचा खप होतो. कॉर्पोरेशननें लहान प्रमाणावर दूध पुरविण्याची योजना ह्यापूर्वीच चालू केली आहे. ह्या छोट्या योजनेप्रमाणें आनंद येथून ५,२०० पौंड दूध रोज मागविलें जातें व तें बाटली-बंद करून शहरांतील ६० केंद्रांमार्फत वाटलें जातें. सध्यां चालू असलेली योजना प्रयोगात्मक नाहीं; मोठ्या योजनेची ती पहिली पायरी आहे. सध्यां चालू असलेली योजना यशस्वी झाली असून तीमुळें अहमदाबादमधील दुधाच्या किंमती स्थिरावण्यास मदत झाली आहे. एप्रिलच्या तीन तारखेस ही योजना सुरू करण्यांत आली. आतां निर्जंतु बाटली-बंद दुधाचा खप रोज ५,००० पौंडांवरून ६,५०० पौंडांपर्यंत वाढला आहे.

---

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें

### ३० सप्टेंबर, १९५४ अखेर संपलेल्या वर्षाचा संचालकांचा अहवाल

अहवालाचे वर्षीं घसारा व मॅनेजिंग एजण्ट यांचें कमिशन यांसिरीज सर्व खर्चेंच वजा जातां रु. १५,९९,१०५-१५-११ नफा झाला आहे. घसारा व मॅनेजिंग एजण्ट यांचें कमिशन हें वजा जातां ताळेबंदास नेलेला निव्वळ नफा रु. ५,६६,३३३-१५-११ आहे. यांत गतवर्षीचा शिल्लक नफा रु. ४४८-३-११ मिळविल्यावर एकूण नफा रु. ५,६६,७८२-३-१० होत असून त्याचा विनियोग पुढीलप्रमाणें सुचविलेला आहे:—

| | | |
|---|---|---|
| प्रेफरन्स भागांवर ५ टक्केप्रमाणें | | |
| करमाफ डिव्हिडंड | रु. | १२,५००—०—० |
| ऑर्डिनरी भागांवर १० टक्केप्रमाणें | | |
| डिव्हिडंड | रु. | २,३७,५००—०—० |
| करासाठी तरतूद | रु. | २,००,०००—०—० |
| नोकरवर्गासाठी बोनसची तरतूद | रु. | ७०,०००—०—० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | रु. | ४६,७८२—३—१० |
| एकूण | रु. | ५,६६,७८२—३—१० |

अहवालाचे वर्षीं उसाचें दर एकरीं प्रमाण ३९ टन पडलें व साखरेचा सरासरी उतारा शेंकडा ११·२ टक्के मिळाला.

१९५४-५५ चे हंगामांत उसाचें एकरीं प्रमाण सुधारून दर एकरीं ५२·२ टन पडलें व साखरेचा सरासरी उतारा ११·६ टक्के मिळाला. एकूण १,३०,०३० साखरेच्या पोत्यांपैकी कंपनीच्या उसापासून १,१२,८४१ पोतीं साखर तयार झाली. कंपनीच्या व्यवस्थापकांचा असा अंदाज आहे कीं, साखरेचा हंगाम १५ एप्रिलपावेतों चालल्यास कंपनीच्या उसाचें प्रमाण दर एकरीं ६० टनांपर्यंत व साखरेचा उतारा शेंकडा १२ टक्केप्रमाणें मिळेल.

सिंडिकेटनें ठेवींचा आंकडा कमी करीत आणला आहे:—

| वर्ष | ठेवींची रक्कम |
|---|---|
| ३०-९-१९५१ अखेर | रु. १,०२,९९,१५० |
| ३०-९-१९५२ अखेर | रु. ९६,३१,३०० |
| ३०-९-१९५३ अखेर | रु. ७३,३५,४०१ |
| ३०-९-१९५४ अखेर | रु. ५७,५९,३९१ |
| अहवालाचे तारखेपर्यंत | रु. ४३,३१,४६६ |

३० सप्टेंबर, १९५४ रोजीं उभ्या असलेल्या उसाचें क्षेत्र २९८६ एकर ९ गुंठे आहे. त्यांपैकीं सुमारें १८४५ एकर ऊंस १९५५-५६ चे हंगामाकरितां गळितासाठी वेण्यांत येईल. सुमारें ९४ एकर ऊंस नवीन लागणीसाठी बेणें म्हणून वापरला जाईल व उरलेला १००० एकर आडसाली व ४७ एकर आडसाली खोडवा, १९५५-५६ सालाकरितां राखून ठेवला आहे.

★ वर्ष अखेर जवळ आली ★
व्याज आकारणीचें पुस्तक ( विस्तृत जंत्रीसह )
व्याजाचे पन्नास दर व एक कोटी रकमेपर्यंत आकारणी
व्याज आकारण्यास अत्यंत
उपयुक्त
पत्ता:—कृ. गो. घाटपांडे, वडगांव स्टेशन, जिल्हा-पुणें.
पांच प्रतींना ट. ख. माफ.

## कोल्हापूरचा गूळ मोसम कसा गेला ?

१९५४–५५ चा गूळ मोसम आतां संपत आला असून आतांपर्यंत ३२ लाख, ६९ हजार गूळ रव्यांची आवक झाली आहे. अजून फार तर अर्धा ते पाऊण लाख गूळ रवे येतील. या वर्षी दिवाळीस गूळ येण्यास सुरुवात झाली, तेव्हां गूळ दर बरे होते. नोव्हेंबरच्या सुरवातीस नवीन गूळ नं.१ चा दर २३ ते २४ रु., नं. २ चा २० ते २१ रु., व नं. ३ चा १६ ते १७ रु. असे दर होते. १९५३–५४ च्या हंगामांत हेच दर पुढीलप्रमाणें होते :—नं. १ चा २७ ते २९ रु., नं. २ चा २४ ते २५ रु. व नं. ३ चा २१ ते २२ रु. मागील सालाच्या मानानें चालू वर्षी उसाचें पीक चांगलें असल्यानें गुळाची आवक फार वाढली व दर गडगडले. १९५३–५४ मध्यें १ जूनपर्यंत १८॥ लाख रवे गूळ आवक झाला होता. गेल्या वर्षीच्या तुलनेनें चालू मोसम कसा गेला हें खालील तक्त्यावरून दिसतें. प्रत्येक महिन्यांतील पहिल्या आठवड्याचे दर खाली दिले आहेत :—

| महिना | १९५३–५४ | १९५४–५५ |
|---|---|---|
| नोव्हेंबर | २१ ते २९ | १७ ते २४ |
| डिसेंबर | १७ ते २२ | ११ ते १८ |
| जानेवारी | २१ ते २६ | १० ते १७ |
| फेब्रुवारी | १७ ते २४ | ८॥ ते १५ |
| मार्च | १६ ते २३ | ८ ते १४ |
| एप्रिल | २१ ते २८ | ७॥ ते १३ |
| मे | २० ते २७ | ८॥ ते १५ |
| जून | १९ ते २६ | ७॥ ते १३ |

—'व्यापार'

### भारतामधील भिकाऱ्यांच्या संख्येंत घट

भारतामधील भिकाऱ्यांच्या व भटक्यांच्या संख्येंत बरीच घट झाल्याची माहिती १९११ ते १९५१ पर्यंत झालेल्या लोकसंख्येच्या गणनेवरून अजमावण्यांत आली आहे. १९११ सालीं ह्या दोन्ही प्रकारच्या लोकांची संख्या २५ लाखांच्या आसपास होती. ती १९५१ च्या सुमारास ५ लाखांपर्यंत खाली घसरल्याचें दिसून आलें आहे. टक्केवारीच्या भाषेंत, ह्या कालांत वरील प्रकारच्या लोकांत ८१ टक्के घट झाली असें म्हणतां येईल. लोकसंख्येच्या प्रमाणाशीं तुलना करतां १९५१ सालीं भारतांत ०·१४ टक्के भिकारी होते. १९३१, १९२१ आणि १९११ सालीं लोकसंख्येच्या प्रमाणांत अनुक्रमें ०·४०, ०·८५ आणि १·०२ टक्के भिकारी होते. राज्यवार लोकसंख्येशीं भिकाऱ्यांच्या पडणाऱ्या प्रमाणाचीहि माहिती कोष्टक रूपानें संकलित करण्यांत आली आहे. १९५१ सालीं 'अ' राज्यांतील भिकाऱ्यांची टक्केवारी पुढीलप्रमाणें होती. बिहार ०·०६ टक्के; पंजाब ०·०८ टक्के; मद्रास ०·१० टक्के; मुंबई ०·११ टक्के; ओरिसा ०·१२ टक्के; आणि पश्चिम बंगाल ०·१७ टक्के. भारतामधील शहरांतून भिकाऱ्यांचें प्रमाण अधिक दिसून येतें. खेडेगांवापेक्षां शहरांत भिकाऱ्यांना अधिक संधि मिळते त्यामुळें त्यांची संख्या अधिक असावी. भिकाऱ्यांच्या एकूण संख्येपैकी ३० टक्के संख्या शहरांत असलेली दिसते. भारताच्या लोकसंख्येपैकी १७.३ टक्के लोकसंख्याच शहरांतून रहाते.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब ब. ह. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. बो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन्. व्ही. पांडव, मॅनेजर



# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) ... | रु. ५०,००,००० |

—यावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन — श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.